वाचले १. मा. महापालिका सभा ठराव क्र. ४७५ दि. २०/२/२०१४
२. मा. महापालिका सभा ठराव क्र. ५४२ दि. १९/८/२०१४
३. धन्वंतरी स्वास्थ्य योजना धोरण २०१३
४. आयुक्तसो. यांचेकडील मान्य प्रस्ताव दि.३१/१/२०१५

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८
क्र.वैद्य/०७/कावि/१५५/२०१५
दि. ३१/१/२०१५

**विषय – धन्वंतरी स्वास्थ्य योजना धोरण – २०१३ चे अंमलबजावणीकरीता समिती गठीत करणेस मान्यतेबाबत**

**आदेश.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील वर्ग १ ते ४ मधील अधिकारी व कर्मचारी तसेच सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी यांचेकरीता धन्वंतरी स्वास्थ्य योजना धोरण २०१३ लागु करणेकामी उपरोक्त वाचले क्र. १ व २ अन्वयेच्या महापालिका सभा ठरावानुसार मान्यता देणेत आली आहे. तसेच उपरोक्त वाचले क्र. ३ अन्वये धन्वतरी स्वास्थ्य योजना धोरण २०१३ निश्चित केलेले आहे. सदरचे धोरण मनपाचे संकेतस्थळावर धोरण या सदराखाली प्रसिध्द केलेले आहे. तसेच यापुर्वी परिपत्रक क्र.वैद्य/७/कावि/२५१३/१४ दि. ३०/१२/१४ अन्वये सर्व विभागप्रमुखाना सभासदत्व स्विकारणेकामी कर्मचाऱ्यानी भरुन द्यावयाचा प्रतिज्ञापत्र नमुना अ व ब याची प्रत मनपाचे संकेतस्थळावरुन उपलब्ध करुन घेवुन प्रतिज्ञापत्र भरणेकामी कळविले आहे, आणि सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी यांचे विहीत नमुन्यातील प्रतिज्ञा पत्र व मधील फॉर्म लेखा विभागामार्फत भरणेकामी कळविले आहे.

मनपाचे धन्वतरी स्वास्थ्य योजना धोरण २०१३ ची अंमलबजावणी करणेकामी आयुक्तसो. यांचे अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे समिती गठीत करणेस उपरोक्त वाचले क्र. ३ अन्वये मान्यता मिळाली आहे. त्या समिती सदस्यांचा सविस्तर तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | अधिकारी / पदाधिकाऱ्याचे नाव व पदनाम | समितीमधील पदनाम |
|---|---|---|
| १ | मा. आयुक्त | अध्यक्ष |
| २ | मा. अध्यक्ष, पिंपरी चिंचवड महानगरपालिका कर्मचारी महासघ | उपाध्यक्ष |
| ३ | मा. अति. आयुक्त | उपाध्यक्ष |
| ४ | मा. आरोग्य वैद्यकीय अधिकारी | कार्याध्यक्ष |
| ५ | मा. मुख्य लेखापाल | खजिनदार |
| ६ | मा. वैद्यकीय अधिक्षक | सदस्य |
| ७ | मा. मुख्य लेखा परिक्षक | सदस्य |
| ८ | मा. कायदा सल्लागार | सदस्य |
| ९ | मा. सहा. आयुक्त, प्रशासन | सदस्य |
| १० | मा. श्री. चंद्रकांत इंदलकर, कामगार कल्याण अधिकारी | सदस्य |
| ११ | मा. श्रीम. रेखा गाडेकर, प्रशासन अधिकारी (महिला) | सदस्य |
| १२ | मा. श्री. मधुकर सोपान रणपिसे, कार्याध्यक्ष, पिंचिंमनपा, कर्मचारी महासंघ | सह खजिनदार |
| १३ | मा. श्री. मनोज प्रितमसिंग माछरे, सह. मुख्य प्रवक्ता, पिंचिंमनपा, कर्मचारी महासंघ | सह खजिनदार |

धन्वंतरी स्वास्थ्य योजना धोरण २०१३ नुसार अंमलबजावणी करणेकरीता व धोरणामध्ये नमुद केलेप्रमाणे वेळोवेळी आढावा बैठक घेणेबाबत मान्यता दिली असल्याने वरील समिती सदस्यांना वेळोवेळी बैठकीसाठी बोलवावे लागणार आहे. त्यामुळे वरील समिती सदस्यांनी नावासमोर नमुद केलेल्या समितीचे पदनामावर कामकाज करणेस सदर आदेशान्वये मान्यता देत आहे.

उक्त नमुद केलेल्या समितीमधील श्री. चंद्रकांत इंदलकर, कामगार कल्याण अधिकारी यांची धन्वंतरी स्वास्थ्य योजना धोरण २०१३ साठी सदस्य म्हणुन नेमणुक केली असल्याने त्यानीच या योजनेचे सचिव म्हणुन संपुर्णपणे कामकाज करणेस या आदेशान्वये मान्यता देत आहे. तसेच धन्वंतरी स्वास्थ्य योजना धोरण २०१३ मध्ये जे धोरण निश्चित केलेले

Scanned by CamScanner

आहे, त्याची संपुर्णपणे अंमलबजावणी व वेळोवेळी आयोजित केलेली बैठकीस वरील अधिकारी व कर्मचारी महासंघाचे पदाधिकारी यांनी उपस्थित राहुन सदर धोरणाची अंमलबजावणी करणेस या आदेशान्वये मान्यता देत आहे.

(राजीव जाधव)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

प्रती -

सर्व संबधित अधिकारी / पदाधिकारी

प्रत –

१. सर्व संबधित विभागप्रमुख

२/- प्रस्तुत आदेशाची प्रत आपले नियत्रणाखालील सर्व अधिकारी यांचे निदर्शनास आणुन द्यावी.

२. मा. अध्यक्ष पिंपरी चिंचवड महानगरपालिका, कर्मचारी महासंघ

आरोग्य वैद्यकीय अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

Scanned by CamScanner